महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २० मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)

संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# विधान भवनाच्या प्रवेशद्वाराजवळ आग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत राज्याचा गाडा हाकला जाणाऱ्या विधान भवन परिसरात आज अचानक धुळीचं साम्राज्य बघायला मिळालं. विधान भवनाच्या प्रवेशद्वारावर आज दुपारच्या वेळी अचानक सर्वत्र धूर बघायला मिळाला. यामुळे सर्वांना विधान भवनाच्या प्रवेशद्वारावर आग लागली असं वाटलं. पण ही आग लागली नसल्याची माहिती नंतर समोर आली. दरम्यान, परिसरात प्रचंड धुराचं साम्राज्य बघायला मिळालं. त्यामुळे एकच खळबळ उडाली. महाराष्ट्र विधानभवनाच्या प्रवेशद्वारावरील तपासणी कक्षात सोमवारी दुपारी तीन वाजता अचानक आग लागली. विद्युत बिघाडामुळे (शॉर्ट सर्किट) ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आग काही मिनिटात विझली असली तरी विधानभवनाच्या सुरक्षा यंत्रणेविषयी आणि विद्युत यंत्रणेविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. आग मुख्यतः विद्युत वाहिन्या, स्विचबोर्ड आणि अन्य विद्युत उपकरणांना लागली होती. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाने तत्काळ कारवाई करत अवघ्या सहा मिनिटांत म्हणजेच तीन वाजून सहा मिनिटांनी आग आटोक्यात आणली. या आगीत कोणतीही जखमी किंवा जीवितहानी झालेली नाही.

दरम्यान विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या आगीच्या घटनेबाबत माहिती देताना सांगितलं की, विधानभवनाच्या स्वागत कक्षाच्या परिसरातही आग लागल्याची घटना घडली आहे. स्कॅनिंग मशिनमध्ये शॉर्ट सर्किट झाला, त्यामुळे ही आग लागली. आगीचं स्वरुप छोटं होतं. या आगीवर आता नियंत्रण मिळवण्यात आलं आहे, अशी माहिती यावेळी नार्वेकर यांनी दिली आहे. दरम्यान जेव्हा ही आगीची घटना घडली तेव्हा आमदार देखील विधानभवनातच होते. आज विविध समित्यांचं उद्घाटन असल्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची देखील उपस्थिती होती.

> विधान भवनाच्या प्रवेशद्वाराजवळ असणाऱ्या स्कॅनिंग मशीनमध्ये शॉर्ट सर्किट झाली. यामुळे तिथून धूर निघायला लागला. हा धूर सर्वत्र पसरायला लागला. त्यामुळे तातडीने प्रशासन अलर्ट झालं. प्रशासनाकडून सर्वोतोपरी काळजी घेण्यात आली. धूर बंद व्हावा यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. तसेच सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर अग्निशामक दलाच्या गाड्या देखील घटनास्थळी पाचरण करण्यात आल्या.
>
> • राहुल नार्वेकर





## आठवडा बाजाराला शेरेकर, चिंबीपाड्यातील ग्रामस्थांचा विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
● राजेश दळवी

**पडघा :** मुंबई - नाशीक महामार्गालगत भरणाऱ्या आठवडा बाजारास शेरेकर, चिंबीपाडा नागरीकांचा विरोधपडघा दि. १९ (प्रतिनिधी) भिवंडी तालुक्यातील पडघा गावाच्या हद्दीतील मुंबई नाशीक महामार्गालगत भरणाऱ्या आठवडा बाजारास शेरेकर, चिंबीपाडा नागरीकांनी विरोध केला आहे. पडघा येथील रविवारच्या आठवडा बाजारासाठी आलेल्या दुकानदारानां गावात जागा मिळत नसल्याने अनेक दुकानदारांनी शेरेकर, चिंबीपाडा गावाकडे जाणाऱ्या मुंबई नाशीक महामार्गालगत बाजार भरवण्यास सुरुवात केल्याने नागरीकांना हायवे क्रॉस व गावात जाण्या- येण्यास त्रास होत असल्याने त्याबाबत ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य महेश वावरे यांनी पडघा ग्रामपंचायत कार्यालयात लेखी निवेदन देऊनसुद्धा कुठलीच कारवाई झाली नाही. दरम्यान सदर धोकेदायक बाजार बाबत सामाजीक संस्थानी आवाज उठविला तसेच त्याबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध होताच पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने कारवाईचे फक्त फलक लाऊन जबाबदारी झटकण्यात आली. मात्र कारवाईला न जुमानता आठवडा बाजार रविवारी (18 मे) भरवण्यात आला. व खरेदीसाठी आलेल्या नागरीकांनी त्याच ठिकाणी वाहने पार्कींग केल्याचे शेरेकर, चिंबीपाडा येथील तरुणांच्या लक्षात येताच त्यांनी एकत्र येत येथील दुकानदारांना व वाहनचालकांना येथुन जाण्यास सांगितले व पडघा ग्रामपंचायतीच्या भोंगळ कारभाराबाबत निषेध व्यक्त करुन संताप व्यक्त केला तसेच हायवे क्रॉस करताना एखाद्या ग्रामस्थाचा अपघात झाल्यास जबाबदार कोण असा सवाल व्यक्त केला. त्यामुळे महामार्गावरील भरणारा हा त्रासदायक आठवडा बाजार लवकर बंद करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.




## टिटवाळाकरांचे स्वप्न असलेल्या परिपूर्ण उद्यानाचे केडीएमसीकडून लोकार्पण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शिवसेना उप-शहरप्रमुख श्री.विजय(भाऊ) मारुती देशेकर हे गेली कित्येक वर्ष,कुठलही सांविधानिक पद नसताना सर्वसामान्य टिटवाळकरांना त्यांच्या हक्काच्या सुख -सुविधा मिळाव्यात म्हणून शासन दरबारास विंनतीवजा अर्ज,प्रसंगी आंदोलन करून ह्या सुख - सुविधा टिटवाळाकरांच्या पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत.त्यांच्या ह्याच अनेक वर्षाच्या प्रयत्नाचे फलित व कल्याण पश्चिमचे कार्यसम्राट आमदार श्री.विश्वनाथ भोईर साहेब,शिवसेना कल्याण शहरप्रमुख रवी पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका स्थापन झाल्यापासून मांडा टिटवाळा परिसरात पहिल्यांदाच न भूतो न भविष्यातो असा दैदीत्यमान उद्यान लोकार्पण सोहळा महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा लोकनेते नामदार श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाला. ह्या प्रसंगी उदघाट्न सोहळ्यास टिटवाळा येथील असंख्य जेष्ठ नागरिक,मांडा टिटवाळा परिसरातील महायुतीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका अधिकारी वर्गाच्या उपस्थितीत फलक अनावरण करून व फीत कापून ह्या उद्यानाची शुभ सुरुवात करण्यात आली. टिटवाळाकरांच्या मनातील आनंद व्यक्त करण्याकरिता शिवसेना मांडा टिटवाळा विभागाच्यावतीने फटाके वाजवून व बालगोपालांना चॉकलेट वाटून मोठ्या प्रमाणात ह्या उत्सवाचा आनंद साजरा करण्यात आला ह्या उद्यानासाठी खऱ्या अर्थाने शासन दरबारी पाठपुरावा करणारे श्री.विजय(भाऊ) मारुती देशेकर यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना तत्कालीन कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त ज्यांनी महापालिकेकडे निधी उपलब्ध नसताना देखील या गार्डनच्या उभारणीसाठी विशिष्ट पद्धतीने म्हणजे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कडून निधीची तरतुद केली त्यातूनही गार्डनचे काम पूर्ण होणार नाही हे ओळखून शहर सौंदर्यकरण बक्षीसाची रक्कमेची देखील ह्या कामासाठी तरतूद करण्यात आली त्या डॉ.इंदुराणी जाखड यांचे व यासाठी ज्या उद्यान अधीक्षक यांची ह्या कामाकरिता मोलाचे कामगिरी लाभली त्यांचे आभार मानले.यासमयी त्यांनी सध्या पालघर येथे जिल्हाधिकारी म्हणून कर्तव्य बजावणाऱ्या तत्कालीन आयुक्त डॉ. जाखड मॅडम या उद्घाटन प्रसंगी उपस्थित नसल्याची खंत जाणवत असल्याची भावना देखील आपल्या मनोगतातून व्यक्त केली.ह्या उद्यानाच्या उद्घाटन प्रसंगी जेष्ठ नागरिक, बालगोपाल वं महिलावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता तसेच ह्या उद्यानाचे काम ज्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले त्या कंपनीचे सर्वेसर्वा श्री.कैलास बाबडे व श्री.मनोज आंबेकर यांचा देखील सन्मान ह्यावेळी करण्यात आला. उपस्थित बालगोपाळ व ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मन भरून आले सतत केलेला पाठपुरावा,माननीय आमदार यांनी केलेले सहकार्य, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांनी दाखवलेली तत्परता यातूनच हे अतिशय उच्च तम व सुंदर असे उद्यान उभारले गेले.ह्या कामाकरिता टिटवाळा येथील अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील खूप सहकार्य केल्याची भावना त्यांनी व्यक्त केली,भविष्यात देखील टिटवाळाकरांच्या आनंदासाठी हवे तेवढे समर्पण देण्याचा मी पूर्ण ताकदीने प्रयत्न करेल.. हीच शाश्वती ह्याप्रसंगी मी टिटवाळाकरांना देऊ इच्छित आहे अशी भावना आपले मनोगत संपवताना शिवसेना कल्याण उपशहरप्रमुख श्री.विजय(भाऊ )मारुती देशेकर व्यक्त केली.

## समृद्धीमुळे ठाणे जिल्ह्यातील व्यवसायाला डाऊनफॉल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
भरत उबाळे

**शहापूर, ता. १९ :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुका ते ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील आमणे या ७६ किमी अंतराच्या अखेरच्या टप्प्यातील महामार्ग खुला होण्याची प्रतीक्षा आहे, परंतु शीघ्रगती समृद्धी महामार्गामुळे मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील लांब पल्ल्याच्या प्रवाशांची वर्दळ आणि वाहनांची संख्याच यामुळे कमी होणार असल्याने या महामार्गावरील व्यवसायाला डाऊनफॉलचा सामना करावा लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे सुरू असलेला व्यवसाय टिकवायचा कसा, या प्रश्नाच्या काळजीने व्यावसायिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.


समृद्धी महामार्गाच्या शीघ्रगतीमुळे प्रवासाच्या वेळेची मर्यादा आपसूकच कमी झाली आहे. तसेच अंतरदेखील घटले आहे. म्हणून जवळच्या अंतरावरून प्रवास करणारे प्रवासी तसेच लांब पल्ल्याच्या प्रवासाला निघालेले प्रवासी विशेषकरून समृद्धी महामार्गालाच पसंती देण्याची दाट शक्यता दिसत आहे. त्यामुळे पर्यायाने मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहनांची वर्दळ कमी होणार असल्याने या महामार्गावरील डिझेल व पेट्रोलपंप चालक, हॉटेल व्यावसायिक, ढाबाचालक, गॅरेज व्यावसायिक यांच्याप्रमाणेच लहान-मोठ्या इतर व्यावसायिकांच्या व्यवसायावर डाऊनफॉल येण्याची दाट चिन्हे आहेत.

मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे ते थेट इगतपुरीपर्यंत गेल्या अनेक वर्षांपासून हॉटेल इंडस्ट्री मोठ्या प्रमाणात फोफावली आहे. महामार्गाच्या दुतर्फा उंची हॉटेल्स असल्याने नाश्ता, चहापान आणि जेवणासाठी महामार्गावरून प्रवास करणारे प्रवासी येथे गर्दी करतात. मुंबई-नाशिक महामार्गामुळेच गेली अनेक वर्षे येथील हॉटेल आणि ढाबा इंडस्ट्री जोमाने सुरू होती, परंतु या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या रोडावणार असल्याने त्याचा थेट परिणाम मुंबई-नाशिक महामार्गावरील व्यवसायावर होणार आहे. परिणामी शीघ्रगती समृद्धीमुळे मुंबई-नाशिक महामार्गावरील व्यावसायिक धास्तावले आहेत. याबाबत हॉटेलमालक इरफान शेख यांनी सांगितले की, आम्ही आतासुद्धा मंदीच्या सावटाखालीच व्यवसाय चालवत आहोत. वाहने समृद्धी महामार्गावरून गेल्याने आम्हाला मोठा फटका बसणार आहे. गॅरेजमालक निवृत्ती भोर यांनी समृद्धी महामार्ग सुरू झाल्यानंतर आमच्या व्यवसायावर गंडांतर येणार आहे. आम्ही आत्तापासूनच धास्तावलो आहोत.



### वाहनांची संख्या कमी होण्याच्या भीतीने व्यावसायिक धास्तावले

## मुरबाड : भुवनपाडा परिसरात विहिरीत पडलेल्या हरीणीच्या पिलाला जिवदान





दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड ■ दिलीप पवार

मुरबाड वनविभागाच्या शिरवली परिमंडळातील भुवनपाडा येथिल हभप छगन महाराज शेळके यांच्या फार्म हाऊस मधील तब्बल चाळीस फुट खोल असलेल्या विहिरीत एक हरिणीचे पिल्लू पडल्याचे शेळके महाराज यांच्या लक्षात आले .त्यांनी काही ग्रामस्थांना याची कल्पना दिली व मुरबाड वनविभागाला या घटने बाबत कळविले असता शिरवली परिमंडळाचे वनपाल श्री . बागकर आपल्या इतर वन कर्मचाऱ्यांना घेऊन त्या ठिकाणी दाखल झाले.खोल विहिरीत पडलेल्या पिल्लाला रेस्क्यू करने अवघड होते. परंतु वन विभागाने भुवन -भुवनपाडा ग्रामस्थांच्या मदतीने या हरीणिच्या पिलाला सुखरूप बाहेर काढून जिवदान दिले आहे.हरिणिच्या पिल्लाचे दैव बलवत्तर होते म्हणून इतक्या उंचीवरून पडून सुध्दा मोठी दुखापत न होता ते सुखरूप होते. फक्त पाठीला थोडी इजा झाली होती.परंतु मोठी जखम नसल्याने वनविभागाने त्याला पुन्हा जंगलात सोडून दिले आहे.अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्यास आम्हांला कळविण्याचे आवाहन वनपाल श्री बागकर यांनी ग्रामस्थांना केले आहे.

## राज्यात पुढील दोन दिवस पावसाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात आजपासून मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही भागांत जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार एकाच वेळी अरबी समुद्र, बंगालचा उपसागर व दक्षिण चीनच्या प्रशांत महासागर या तीन समुद्रात १७ ते २० डिग्री उत्तर अक्षवृत्तदरम्यान तीनही ठिकाणी तयार होणारे कमी दाब क्षेत्रे व त्यातून तयार होणारी चक्रीय वाऱ्यांची स्थिती आणि या तीनही ठिकाणी त्यांच्या उत्तरेकडे होणाऱ्या मार्गक्रमणामुळे वळिवाच्या गडगडाटी पावसाची शक्यता या आठवड्यात निर्माण झाली आहे. तसेच अरबी समुद्रातील गुजराथकडे तर बंगालच्या उपसागरातील ओरिसा छत्तीसगडकडे चक्रीय वाऱ्यांचे मार्गक्रमण होणार आहे. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्र व गुजराथ, ओरिसा आणि बंगाल येथे अवकाळी पावसाची शक्यता आहे.

मंगळवारपर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा भागात गडगडाटासह वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. याचबरोबर उत्तर कोकणातील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडेल. या कालावधीत ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. आठवडाभर पावसाचा मारा सुरु राहील. दरम्यान, आठवडाभर हा वळवाचा पाऊस सक्रीय राहील. विशेषतः सिंधुदुर्ग, रत्नागिरी, खानदेश नाशिक, पुणे सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड या जिल्ह्यांत वळवाच्या पावसाचा प्रभाव अधिक असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

## महाराष्ट्रातील अधिकारी राजशिष्टाचार पाळत नाही !

### अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून सरन्यायाधीश भूषण गवई यांची खंत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई : भारताचे सरन्यायाधीश भूषण तथा बी. आर. गवई हे रविवारी मुंबईत आले. सरन्यायाधीश झाल्यानंतर ते प्रथमच मुंबईत आले. राजशिष्टाचारानुसार त्यांचे स्वागत करण्यासाठी पोलीस व प्रशासनातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. मात्र, तसे न झाल्याने 'महाराष्ट्रातील वरिष्ठ अधिकारी राजशिष्टाचाराचे पालन करत नाही', अशी खंत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.

'राजशिष्टाचाराचे पालन राज्यातील अधिकारी करत नाहीत, याबद्दल मी निराश झालो आहे. जर भारताचा सरन्यायाधीश प्रथमच महाराष्ट्रात येत असेल, तर राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त हे उपस्थित असणे अपेक्षित आहे. त्यांची अनुपस्थिती विचार करायला लावते', अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश गवई रविवारी मुंबईत आले होते. 'महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिल'ने त्यांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मात्र, त्यांचे स्वागत करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक किंवा मुंबईचे पोलीस आयुक्त हजर नव्हते. प्रोटोकॉलचा भंग झाल्याने सरन्यायाधीश गवई यांनी आपल्या भाषणात नाराजी व्यक्त केली. गवई म्हणाले की, न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका हे लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ आहेत. या सर्वांनी एकमेकांचा सन्मान करणे आवश्यक आहे. भाषणाच्या दरम्यान गवई हे भावनाविवश झाले. त्यांनी म्हटले, "मी सर्वांचा खूप आभारी आहे. मला जे प्रेम आणि सन्मान मिळाला आहे, त्याने मी भारावून गेलो आहे. गेली ४० वर्षे मला हा स्नेह मिळत आहे. आजचा कार्यक्रम माझ्यासाठी अविस्मरणीय आहे, असे त्यांनी सांगितले.











# जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे पत्रकारिता पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बारावी व पदवी नंतर विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात कौशल्यपूर्ण करिअर घडवण्यासाठी मुंबई विद्यापीठ संलग्नित व नॅक मूल्यांकन प्राप्त जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे बीएएमएमसी हा पत्रकारिता पदवी व एम.ए (एमसीजे) पत्रकारिता पदव्युत्तरअभ्यासक्रम संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून कार्यान्वित आहेत.

बारावीचा रिझल्ट लागताच बीएएमएमसी पत्रकारिता पदवीचे प्रवेश सुरु झाले आहेत. तसेच पदवी चा निकाल लागताच एम.ए (एमसीजे) पत्रकारिता पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे देखिल प्रवेश सुरू झाले आहेत .जागा मर्यादीत असल्याने विद्यार्थ्यांनी तातडीने प्रवेश घ्यावेत.

पत्रकारितेच्या क्षेत्रात व्यावसायिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जीवनदीप महाविद्यालय गोवेलीने एक सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. मुंबई विद्यापीठ अंतर्गत मल्टिमीडिया अँड मास कम्युनिकेशन(बीएएमएमसी) या तीन वर्षाच्या पदवी एम . ए मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५~२६ करिता थेट प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. (बीएएमएमसी)या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर थेट प्रवेश मिळणार आहे. तसेच कोणत्या ही शाखेतून पदवी झाल्यावर एम.ए (एमसीजे) या अभ्यासक्रमासाठी थेट प्रवेश मिळणार आहे हे दोन्ही अभ्यासक्रम स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त आहे.

या अभ्यासक्रमांसाठी अनुभवी प्राध्यापक वर्ग, अत्याधुनिक स्टुडिओ, मीडिया लॅब तसेच प्रात्यक्षिक शिक्षण व इंटरशिपवर विशेष भर देण्यात येतो. शॉर्टफिल्म, डॉक्युमेंटरी प्रॉडक्शन, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, अँकरिंग यासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न विभागाकडून केला जात आहे. महाविद्यालयाकडे स्वतःचे दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता हे वृत्तपत्र असून, स्वतंत्र संगणक लॅब आणि प्लेसमेंट सुविधा सुद्धा पुरवण्यात येतात. त्यामुळे हे अभ्यासक्रम केवळ सैद्धांतिक नव्हे, तर व्यावहारिक ज्ञानही पुरवणारा ठरत आहे. या अभ्यासक्रमांसाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती देखील उपलब्ध आहे

या पत्रकारिता पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमामुळे आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी यशस्वी करिअर घडवले असून, टी.व्ही. चॅनल्स, वृत्तपत्र, आकाशवाणी, एफ.एम. रेडिओ, वेब मीडिया, रेडिओ जॉकी, जनसंपर्क अधिकारी, संवाददाता, उपसंपादक, निवेदक, रिपोर्टर, युट्युबर, सोशल मीडिया मॅनेजर, डिजिटल मीडिया मॅनेजर अशा विविध माध्यम क्षेत्रांमध्ये विद्यार्थी कार्यरत आहेत. तरी बारावी व पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींनी या अभ्यासक्रमासाठी अवश्य प्रवेश घ्यावा आणि सामाजिक क्षेत्रातील उज्ज्वल करिअरसाठी आतापासूनच तयारी सुरू करावी. सर्जनशीलता, अभ्यासूपणा व सामाजिक भान असणाऱ्या विद्यार्थिनींसाठी ही सुवर्णसंधी आहे. तरी या अभ्यासक्रम प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी डॉ.राहुल तौर विभाग प्रमुख ९४२१०५९३९६ यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन गोवेली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.बी कोरे व डॉ .अशोक वाघ यांनी केले आहे.

या पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमामुळे टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, आकाशवाणी, एफ.एम. रेडिओ, वेब मीडिया, रेडिओ जॉकी, जनसंपर्क अधिकारी, संवाददाता, उपसंपादक, निवेदक, रिपोर्टर, यूट्यूबर, सोशल मीडिया मॅनेजर, डिजिटल मीडिया मॅनेजर अशा विविध क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी आहेत

# कचऱ्यापासून वीज निर्मिती करणारा महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प कल्याण डोंबिवलीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** नागरी स्वच्छतेला चालना देण्यासाठी आणि रहिवाशांसाठी जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने कचरा व्यवस्थापन उपाययोजनांमध्ये आघाडीवर असलेल्या सुमीत एल्कोने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) सोबत अधिकृत भागीदारी करत महाराष्ट्रातील पहिला संपूर्णपणे एकात्मिक शहर स्वच्छता व कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्प सुरू केला आहे. प्रकल्पाचे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी 18 तारखेला डोंबिवली पूर्वेकडील क्रीडा संकुल येथे उदघाटन करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार सुलभा गायकवाड, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे व आयुक्त अभिनव गोयल, आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



या मोठ्या प्रमाणावर राबवल्या जाणाऱ्या उपक्रमात संपूर्ण कचरा मूल्य साखळी अंतर्भूत आहे. त्यामध्ये संकलन, वाहतूक, वर्गीकरण, कचऱ्यापासून ऊर्जा आणि बायो CNG निर्मिती यांचा समावेश आहे.या उपक्रमाचा कालावधी 10 वर्षांचा असून सर्वसाधारणपणे आजवर वापरल्या जात असलेल्या पारंपरिक टिपिंग फी मॉडेलला पर्याय म्हणून महाराष्ट्रात पहिल्यांदाच 'इनिशियल अॅग्रिड कोट' मॉडेलनुसार राबवला जाणार आहे. कार्यक्षमतेच्या अनुषंगाने अधिक वाजवी खर्च आणि जबाबदारी यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे.

या प्रकल्पाअंतर्गत दररोज 600 टनांहून अधिक कचऱ्याचे व्यवस्थापन केले जाईल आणि त्यासाठी 350 हून अधिक विशेष वाहनांचा ताफा वापरला जाईल. त्यात वर्गीकृत विभागांसह LMV टिपर्स, बॅटरीवर चालणारी वाहने आणि हुक लोडर्स यांचा समावेश आहे. घरोघरी जाऊन केले जाणारे संकलन 4.5 लाख घरे आणि 50000 हून अधिक व्यावसायिक आस्थापना याठिकाणी कचरा संकलन केले जाईल. यासाठी विशेष CSS टीम्स आणि 200 हून अधिक RC कंटेनर्स वापरले जातील. ते झोपडपट्टी व चाळींच्या भागांमध्ये सेवा देतील.

- सुमीत एल्कोसोबत भागीदारी करणे हे स्वच्छ आणि कचरामुक्त कल्याण-डोंबिवलीचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने टाकलेले स्मार्ट पाऊल आहे. कार्यक्षम कौशल्य आणि उत्कृष्टतेबद्दलच्या वचनबद्धतेमुळे हा उपक्रम नागरी स्वच्छतेत नवीन मापदंड निर्माण करेल आणि आपल्याला कचरामुक्त कल्याण-डोंबिवलीच्या स्वप्नाच्या अधिक जवळ नेईल असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी सांगितले.
- 226 मॅन्युअल स्ट्रीट स्वीपर्स आणि कचरामुक्त कॉरिडॉर निर्मिती यासारख्या अतिरिक्त वैशिष्ट्यांसह, हा प्रकल्प प्रभावी सामाजिक संपर्क, नागरिक जागरूकता मोहिमा आणि एक मजबूत निरीक्षण प्रणाली यांच्या सहाय्याने दीर्घकालीन परिणाम सुनिश्चित करेल.
- कचरा व्यवस्थापन आणि शहर स्वच्छता प्रकल्पासाठी सुमीत एल्कोचा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसोबत करार
- पारंपरिक टिपिंग फी पद्धतीपासून फारकत घेत महाराष्ट्रातील 'इनिशियल अॅग्रिड कोट' मॉडेलवर आधारित पहिला कचरा प्रकल्प
- दैनंदिन 5 लाखांहून अधिक घरे / व्यावसायिक आस्थापना आणि 600 हून अधिक TPD कचऱ्याचे व्यवस्थापन 350 हून अधिक वाहने आणि प्रगत पायाभूत सुविधांद्वारे केले जाणार.
- सुमीत एल्को कंपनी सोमवार, 19 मे 2025 पासून महानगरपालिकेच्या सर्व वॉर्डमध्ये एक आठवड्याकरिता (19 ते 25 मे) ITAC (इनिशियल टोटल एरिया क्लिनिंग) मॉडेल लागू करेल. त्यानंतर 26 मे 2025 पासून हा प्रकल्प टप्प्याटप्प्याने सुरू होणार..
- कामगिरी आधारित या कराराअंतर्गत सुमीत एल्कोचे दरमहा खालील मुख्य कार्यक्षमतेच्या निर्देशांकांवर (KPIs) आधारित निरीक्षण केले जाईल:
- प्राथमिक आणि द्वितीय संकलन वेळेत करणे (TAT पालन) GPS टेलीमेट्री वापरून वाहन ट्रॅकिंग आणि मार्गपालन कचरामुक्त कॉरिडॉर देखभाल
- स्वच्छता हे सर्वांचे ध्येय व उद्दिष्ट आहे. चेन्नई पेक्षा आपल कल्याण डोंबिवली शहर स्वच्छ व सुंदर होईल. या शहराचे रूप बदलेल. प्रथम क्रमांक मिळेल असे काम होईल. या शहराला आगळ वेगळं महत्व आहे. दहा वर्षांपूर्वी आम्ही निवडणूकीच्या काळात आलो होतो तेव्हा रस्त्यावर खड्डे होते. परंतु आता 25 वर्ष तरी खड्डे मुक्त शहर झाले आहे. विकासाची गंगा आपण आणत आहे. पंतप्रधान मोदींनी स्वच्छ भारत अभियान घेतले. देशभरात हे अभियान सुरु आहे.

# कल्याण आरटीओ सुसज्ज इमारतीचे लोकार्पण

## परिवहन विभागाने अधिक गतिमान, लोकाभिमुख व्हावे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** परिवहन विभागाने अधिक गतिमान, लोकाभिमुख व्हावे अशी अपेक्षा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. कल्याण आरटीओ म्हणजेच उप प्रादेशिक परिवहनच्या सुसज्ज कार्यालयाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते काल करण्यात आले. त्यावेळी उपस्थितांशी बोलताना त्यांनी ही अपेक्षा व्यक्त केली.




परिवहन विभाग हा राज्याचा कणा आहे. प्रताप सरनाईक यांची या मंत्रीपदी नियुक्ती झाल्यावर या विभागाला गती आली आहे. परिवहन आणि प्रादेशिक परिवहन विभाग असे दोन विभाग या मंत्रालयाच्या अखत्यारीत येतात. मात्र एसटीकडे विशेष लक्ष द्यावे लागते. त्यामुळे या दोन्ही विभागाची योग्य सांगड घालून आपल्याला पुढे जायचे आहे असे मतही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.

तर परिवहन विभागाकडून महसूल हवा असेल तर कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. या नवीन कार्यालयातून लोकांना उत्तम सेवा मिळावी यासाठी तुम्ही सर्वजण कामकाज स्मार्ट करत आहात, एआयचा वापर करत आहात, लायसन्स आणि परवाने देताना नवीन यंत्रणा वापरत आहात हे निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र त्यासोबतच लोकांचा वेळ वाचावा, त्यांना ईज ऑफ लिव्हिंग वाटावे, लोकांची कामे त्वरित व्हावीत यासाठी यंत्रणेने अधिकाधिक लोकाभिमुख होऊन काम करावे अशी अपेक्षाही एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, आमदार विश्वनाथ भोईर, आमदार कुमार आयलानी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, शिवसेना कल्याण पश्चिम शहरप्रमूख रवी पाटील तसेच कल्याणचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल, परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# गांजाची अवैधरित्या विक्री करणाऱ्या तरुणास अटक !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामिण प्रतिनिधी

अवैद्यरित्या अंमली पदार्थ (गांजा) विक्री करणाऱ्या तरुणास सात लाखांच्या मुद्देमालासह येथील स्थानिक गुन्हे शाखा युनिट व वासिंद पोलिस ठाणे या पथकाकडून अटक करून कारवाई केली आहे. 1 मे 2025 पासून संपूर्ण ठाणे जिल्हयात अंमली पदार्थ विरुध्द विशेष मोहीम सुरु करण्यात आली असून त्याअनुषंगाने ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डि.एस स्वामी व अप्पर पोलीस अधिक्षक भारत तांगडे यांचेकडुन ठाणे ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रात अवैद्य अंमली पदार्थ विक्रीवर प्रतीबंध करणे व त्यावर कारवाई करणेबाबत आदेश देण्यात आले असता स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांनी ठाणे ग्रामीण जिल्हयात अवैद्य धंदयाबाबत गोपनीय माहीती मिळवुन कारवाई करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले. सदर पथक अंमली पदार्थबाबत माहीती मिळवीत असताना पो.उप. निरीक्षक महेश कदम व अंमलदार असे येथील परीसरात गस्त करीत असताना



पो.हवालदार प्रकाश साईल यांना गस्त दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीदार नुसार वासिंद पोलिस निरीक्षक हर्षवर्धन बारवे व अंमलदाराच्या मदतीने येथील मौजे खातीवली गाव हद्दीतील शुभवास्तु या गृहसंकुलमध्ये छापा मारला असता येथील विशाल वसंत शेलार (वय 28 ) वर्षे यांचेकडुन 2 लाख10 हजार रु किंमतीचा एकुण 7 किलो वजनाचा "गांजा" हा अंमली पदार्थ व 5 लाख रुपये रोख रक्कम असा एकुण 7 लाख 10 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल विक्री करण्याचे उद्देशाने बेकायदेशीररित्या स्वतःचे ताबे कब्जात बाळगुन विक्री करीत असताना मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन नमुद इसमास ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर इसमा विरुध्द वासिंद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तर सदरची कारवाई ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डि.एस स्वामी व अप्पर पोलीस अधिक्षक भारत तांगडे यांनी दिलेल्या आदेश व सुचने प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे, पो.नि. हर्षवर्धन बारवे, पो.उप.निरीक्षक महेश कदम, सहा.पो.उपनिरीक्षक एस.व्ही. कदम, पो. हवा. संतोष सुर्वे, पो. प्रकाश साईल, पो.हवा गोविंद कोळी, सतीष कोळी, पो.शि. स्वप्नील बोडके, वासिंद पोलिस ठाण्याचे पो.ह.विजय गांजाळे, महिला पो.शि. वर्षा केदारे, पो.शि. नामदेव पवार, पो.शि.अख्तर तडवी, महिला पो.शि. कविता राऊत, पो.शि. शैलेश दळवी, पो.शि. नितीन ढोबळे, पो.शि. शशिकांत दिघे, पो.शि. सुरज भांगरे यांच्या पथकाने कारवाई केली आहे. तर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बारवे हे करीत आहेत.

# मुंबई गोवा महामार्गाची उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगतीपथावर आहेॅ. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज रायगड जिल्ह्यातील महामार्गाच्या कामाची हवाई आणि प्रत्यक्ष पाहणी करून काम पूर्ण करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला. महामार्गावरील अपूर्ण पूल, बाह्य वळणे आणि सर्विस रोडची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.



तसेच या महामार्ग संदर्भात मंत्रालयात वरिष्ठ पातळीवर बैठक घेऊन ज्या कामांसाठी राष्ट्रीय महामार्ग तर्फे निधी उपलब्ध होऊ शकत नाही त्यासाठी राज्य शासन निधी उपलब्ध करून देईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. माणगाव येथील आनंद भुवन सभागृहात मुंबई गोवा महामार्ग आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे,खा. सुनील तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले उपस्थित होते. या बैठकीत रायगड जिल्ह्यातील पनवेलपासून ते महाड पर्यंत मुंबई गोवा महामार्गाचा आढावा घेण्यात आला. माणगाव व इंदापूर येथील वाहतूक कोंडी विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कामामध्ये होणाऱ्या दिरंगाई बद्दल नाराजी व्यक्त केली. नागरिकांना सेवा देण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहेॅ. त्यामुळे जिथे केंद्राकडून निधी उपलब्ध होऊ शकणार नाही त्यासाठी राज्य शासनाला परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. अर्थसंकल्पत निधीची तरतूद करण्यात येईल असे त्यांनी यावेळी स्पष्ट सांगितले. तसेच या कामांचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले. पर्यायी मार्ग उपलब्ध करासध्या माणगावातील बायपास तातडीने पूर्ण होणार नाही हे खरे आहे. परंतु, इंदापूर ते कशेणे कालवा रोड पर्यायी मार्ग तसेच माणगाव शहरातील मोर्बा रोड, कालवा मार्ग ते मुंबई गोवा महामार्ग असा पर्यारी मार्ग उपलब्ध करा येऊ शकतो. तसेच साईनगर कालवा मार्ग, भादाव ते विंचवली हा मार्ग झाल्यास कायमस्वरूपी वाहतूक कोंडीतून सुटका होईल.

माणगाव शहरातील नगरपंचायत हद्दीत उपकालवा जातो. या कालव्यालगत पाटबंधारे विभागाची जागा आहे. त्या जागेतून रस्ता बनविल्यास वाहतूक कोंडी कमी होईल. या पर्यायी मार्गांसाठी केंद्र सरकारने मदत न केल्यास राज्य सरकारच्या माध्यमातून तातडीने निधी उपलब्ध करून दिला जाईल. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तत्काळ पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्या अशा सुचना त्यांनी संबंधित यंत्रणेला यावेळी दिल्या.

इंदापूर माणगाव बायपासचे टेंडर निघाले आहे. परंतु, लोणेरे येथील महामार्ग चे काम पूर्ण झाल्याशिवाय बायपासचे काम करणाऱ्या नवीन कंत्राटदाराला वर्क ऑर्डर देता येणार नाही अशी माहिती अधिकाऱ्यांनी यावेळी बैठकीत दिली. याबाबत उच्च स्तरावरून प्रयत्न करण्यात येतील असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई गोवा महामार्ग लगत अनेक छोटी मोठी गावे आहेत. तेथील नागरिक महामार्गावरून प्रवास करीत असतात. त्या नागरिकांना सेवा देणे हे आपले कर्तव्य आहे. जिथे गरज वाटेल तिथे सर्विस रोड बनविले पाहिजेत. कोकणात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. सर्विस रोड बनवत असताना तेथे पाणी साचणार नाही यासाठी बाजूला गटारी सुद्धा बांधली गेली पाहिजे. सर्विस रोड वरून नागरिकांची मोठी वाहने सुद्धा या बाजूकडून त्या बाजूकडे सहजरीत्या गेली पाहिजेत यासाठी योग्य ती उंची राखूनच काम केले गेले पाहिजे. नागरिकांचे हित बघूनच अधिकाऱ्याने काम करावे अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मुंबई गोवा महामार्गाने प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांना पर्यायी मार्गाने वळविण्यात यावे. असे आदेश त्यांनी यावेळी दिले.खा. सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी या महामार्गाच्या कामाच्या अनुषंगाने सूचना केल्या. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. या बैठकीला जिल्हा प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# अकरावीच्या नव्या शैक्षणिक वर्षाकरिता राज्यस्तरीय केंद्रीयकृत प्रवेश प्रक्रिया सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. १९ मे /ठाणे :** राज्यस्तरीय केंद्रीयकृत ११वी प्रवेशप्रक्रिया (शैक्षणिक वर्ष २०२५–२६) सुरू झाली असून, ठाणे जिल्ह्यातील ४५४ कनिष्ठ महाविद्यालये यामध्ये सहभागी झाली आहेत. सर्व विद्यार्थी आणि पालकांनी वेळापत्रकानुसार ऑनलाईन नोंदणी व प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

फेरी क्र.१चे तपशीलवार वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे:

१९ - २० मे सराव सत्र (Practice Session) – विद्यार्थ्यांसाठी पोर्टलवर

२१ - २८ मे प्रत्यक्ष नोंदणी व महाविद्यालय पसंतीक्रम भरणे (१ ते १० पर्यंत)

३० मे तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर

३० मे – १ जून हरकती व दुरुस्ती प्रक्रिया

३ जून अंतिम गुणवत्ता यादी जाहीर

५ जून गुणवत्तायादीवर आधारित प्रवेश वाटप (शून्य फेरी)

६ जून वाटप केलेल्या महाविद्यालयांची यादी पोर्टलवर प्रसिद्ध

६ - १२ जून "Proceed for Admission" पर्यायाद्वारे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे

१४ जून दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची यादी जाहीर

प्रवेश प्रक्रिया पूर्ण करताना विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्रांची स्कॅन प्रत अपलोड करणे आणि संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहून कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी प्रथम पसंती मिळाल्यास तिथेच प्रवेश घेणे अनिवार्य राहील.

एकदा प्रवेश घेतल्यानंतर तो अंतिम मानण्यात येईल. त्यामुळे पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये गांभीर्याने सहभागी व्हावे आणि वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.

# उरण येथे रक्तदान शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनने रविवारी उरण येथील संत निरंकारी सत्संग भवन, हनुमान कोळीवाडा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले. निष्काम सेवा आणि समर्पणाचे प्रेरणादायी उदाहरण प्रस्तुत करत या शिबिरामध्ये ६० निरंकारी भक्तांनी उत्साहाने रक्तदान केले. रक्त संकलनाची प्रक्रिया संत निरंकारी ब्लड बँक, विलेपार्ले यांच्या माध्यमातून पार पडली. या मानवतावादी उपक्रमात संत निरंकारी मिशनच्या उरण परिसरातील स्वयंसेवकांनी मोलाची भूमिका बजावली. जवळपास १५० भक्तांनी रक्तदानासाठी नोंदणी केली होती.








मंगळवार
२० मे २०२५

**मेष**
कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. दिवस उत्तम राहील. व्यवहारात थोडे सावध राहावे.

**वृषभ**
आर्थिक लाभाचे नवीन स्रोत दिसू शकतात. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**मिथुन**
तुम्ही अशा व्यक्तीला भेटू शकता जो तुम्हाला भविष्यात खूप फायदे देऊ शकेल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**कर्क**
आज तुमचा दिवस आनंदाचे क्षण घेऊन आला आहे. आवश्यक नसलेल्या कामांमध्ये रमू नका.

**सिंह**
वेळ वाया न घालवता आणि रखडलेली कामे पुन्हा सुरू केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

**कन्या**
जोडीदारासोबत कुठेतरी फिरण्याची योजना बनू शकते. दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे.

**तूळ**
या राशीच्या लोकांना त्यांच्या मेहनतीचे सकारात्मक परिणाम मिळतील. सबुरीचं फळ मिळेल.

**वृश्चिक**
आज आत्मविश्वास वाढेल. कोणतीही योजना सुरू करण्यासाठी दिवस तुमच्यासाठी चांगला आहे.

**धनु**
भविष्यात तुम्हाला भरपूर लाभ मिळतील. दिवस तुमच्यासाठी चैतन्यपूर्ण व चांगला जाणार आहे.

**मकर**
एखाद्या गोष्टीबद्दल थोडे गोंधळलेले असाल, मित्रासोबत दिवस शेअर केल्यास तुम्हाला आराम मिळेल.

**कुम्भ**
आज तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. दिवस खूपच चांगला जाणार आहे.

**मीन**
आज ऑफिसमध्ये कामाचा ताण वाढू शकतो. तुमच्या जवळच्या व्यक्तीकडून काही बक्षिस मिळेल.

## खारघरमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत - सायकलस्वारांवर हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खारघर, ता. १९ (बातमीदार)** : खारघर परिसरात मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाने ग्रामस्थ आणि रहिवासी त्रस्त असून, पालिका प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे. सेक्टर १०मधील रंजीत जोगी हे रविवार (ता. १८) सकाळी सायकलिंगसाठी गेले असता, कस्तुरी इमारतीसमोरील पदपथावर बसलेल्या एका मोकाट कुत्र्याने जोगी यांच्या डाव्या पायाला चावा घेतल्याने त्यांना दुखापत झाली आहे. सेक्टर १० परिसरातील रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दररोज रस्त्यावर मोकाट कुत्र्यांची टोळी बसलेली असते. कुत्र्यांच्या भीतीपोटी लहान मुलांना सोसायटीच्या बाहेर पडणे मुश्कील झाले आहे. कोपरा गाव आणि वसाहत सेक्टर १० वसविण्यात आली आहे. कोपरा गावातही मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. परिसरात रात्रीच्या वेळी रस्ते आणि पदपथावर वडापाव, चायनीज अशा खाद्यपदार्थांच्या हातगाड्या असतात. रात्री शिल्लक असलेले टाकाऊ पदार्थ तेथेच फेकले जातात. मोकाट कुत्र्यांना खाद्यपदार्थ उपलब्ध होत असल्यामुळे कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. त्यामुळे महापालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

## नवतरुण बौद्ध मित्र मंडळ यांच्यावतीने दुष्मी येथे समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**पेण :** पेण तालुक्यातील दुष्मी येथे नवतरुण बौद्ध मित्र मंडळ दुष्मी यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध महामानवांचे प्रतीकात्मक पेहेराव करून शोभायात्रा, "ओबीसी समाजासाठी बाबासाहेबांचे योगदान" या विषयावर ॲड. रोशन पाटील यांचे व्याख्यान तर ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने "हर घर संविधान" या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले होते. या कार्यक्रमास पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, ॲड. रोशन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य डी.बी. पाटील, मंडळाचे अध्यक्ष दीपक कांबळे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर, भारतीय बौद्ध महासभेचे चंद्रकांत सोनवणे ज्येष्ठ कार्यकर्ते दयानंद भगत समाजसेवक राजूशेठ पिचिकाआदी मान्यवर उपस्थित होते. सदर भीम जयंती उत्सव संपन्न होण्यासाठी राष्ट्र सेवा दल रायगड, ग्राम संवर्धन सामाजिक संस्था रायगड, शिवछावा प्रतिष्ठान दुष्मी, जयंती महोत्सव समिती अध्यक्ष दीपक कांबळे, उपाध्यक्ष मंगेश कांबळे, सचिव सचिन कांबळे, खजिनदार संदेश कांबळे, सुनील कांबळे, रमेश कांबळे, प्रकाश कांबळे, विश्वास कांबळे, यशवंत कांबळे, अनिल कांबळे, भीमराव कांबळे, तुळशीदास कांबळे ,निलेश कांबळे, मिलिंद कांबळे, संदीप जनार्दन कांबळे, संदीप म. कांबळे, अभिजीत कांबळे, महेश कांबळे, करण कांबळे, प्रणय गायकवाड, प्रणित गायकवाड, अनुराग कांबळे, शुभम कांबळे, संस्कार कांबळे, विनोद शिंदे, प्रतिभा मोहिते, यांच्यासह सर्व महिला कार्यकारिणी सदस्यांनी मेहनत घेतली शेवटी उपाध्यक्ष मंगेश कांबळे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ता शिबीर संपन्न

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबई जिल्हा वतीने समितीचे काम करण्यास इच्छुक असणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी १८ मे रोजी ज्ञानविकास विद्यालय-कोपरखैरणे येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन पत्रकार- स्तंभलेखक राजेंद्र घरत यांच्या हस्ते एका अभिनव प्रयोगाद्वारे मेणबत्ती पेटवून करण्यात आले.

आजच्या काळात समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याची फार मोठी गरज असून शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या मनात विवेकवाद, बुध्दीप्रामाण्यावाद रुजवायचे काम केल्यास अंनिसचे कार्य आणखी झपाट्याने वाढत जाईल असा आशावाद घरत यांनी यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पंचसूत्री या विषयावर सादरीकरण अशोक निकम यांनी केले. समिती ज्या पाच सूत्रावर कार्य करते त्याचा आशय व कालसुसंगता त्यांनी मांडली. वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयाची मांडणी पी.पी.टी.द्वारे सुशीला मुंडे यांनी केली.वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय, त्याची परंपरा इतिहास, पृथ्वीची निर्मिती, मानवी उत्क्रांती, शास्त्रीय पद्धती इत्यादी विविध मुद्दे त्यांनी सहजसोप्या स्वरूपात मांडले. वरकरणी अवघड भासणाऱ्या मन मनाचे आजार या अवघड विषयावर प्रा.मच्छिन्द्रनाथ मुंडे यांना संवादी स्वरूपात दैनंदिन उदाहरणे देऊन समजावून सांगितला. यात विविध भ्रम, भास, मनाचे आजार याची माहिती दिली.

या दरम्यान कार्यकर्त्यांनी चळवळीची गाणी गाऊन वातावरण प्रफुल्लीत केले. दुपारच्या सत्रात चमत्कारामागील विज्ञान सत्रात नंदकिशोर तळाशीलकर यांनी विविध प्रयोग व त्यामागील शास्त्रीय कारण स्पष्ट केले. यात हवेचा दाब, प्रश्नचिन्ह, लोट्यातून पाणी काढणे, पाण्यातील नाणे, कागदावर अक्षरे उमटवणे, इत्यादी प्रयोग कार्यकर्त्यांनी करून दाखवले व त्यामागील शास्त्रीय कारण सांगितले.प्रा.मच्छिन्द्र मुंडे यांनी आकड्याचा खेळ, अग्नी पेटवणे, मनातील संख्या ओळखणे असे प्रयोग करुन दाखवले. महा. अंनिस. कार्यकर्ते जयश्री मोरे, स्वाती सुरडकर, दीपरत्न सुरडकर, निरंजन थोरात, निवास पडळकर, कॅ. सी. जे. लेपांडे, अरूण जाधव यांनी शिबिरात सक्रिय सहभाग घेतला. समारोप प्रसंगी भाषण करताना अरविंद सोनटक्के यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन, चार्ल्स डार्विन यांचे कार्य, मानवी उत्क्रांती यांचे महत्व सांगितले. सर्व शिबिरार्थीना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रवाही निवेदन प्रदीप कासुर्डे यांनी; तर आभार प्रदर्शन राजेंद्र पंडित यांनी केले.

## शिवसेना (उबाठा) शहापूर शहरप्रमुखपदी विजय देशमुख

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**शहापूर ग्रामिण ❍ नरेंद्र पाटील**

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून शहापूर शहरप्रमुख पदी विजय देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. शहापूर तालुक्यात शिवसेना (उबाठा) पक्ष संघटनेच्या वतीने काही पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या नियुक्त्या करण्यात येत असून शहापूर शहरप्रमुख पदी विजय देशमुख, उपशहरप्रमुख पदी बाळा निमसे तर तालुका विस्तारकपदी गणेश अवसरे यांची निवड करण्यात आली आहे. यानिवडी वेळी उपजिल्हा प्रमुख शंकर खाडे, तालुका कार्यकारिणी सदस्य रमेश जगे, जिल्हासह सचिव डॉ. अजित पोतदार, तालुका प्रमुख कुलदीप धानके, सचिव रविंद्र लकडे, विभाग प्रमुख शरद मोगरे, रवि पितळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मुरबाड भाजपा मंडळ अध्यक्षपदी दिपक पवार व जितेंद्र भावार्थे यांची निवड!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड ● दिलीप पवार



स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणूका जवळ येत असून या निवडनुकांचे वारे वाहू लागले असताना मुरबाड कुणबी समाज हॉल येथे भाजपा मंडळ अध्यक्ष निवड व कार्यकर्ता मेळावा मुरबाड येथे घेण्यात आला. यावेळी भाजपा मुरबाड तालुका ग्रा.पुर्व मंडळ अध्यक्ष पदी दिपक शांताराम पवार तर भाजपा ग्रा.पश्चिम मंडळ अध्यक्ष पदी ऍड. जितेंद्र कृष्णा भावार्थे यांची निवड करून आमदार किसनजी कथोरे, ठाणे जिल्हा ग्रा.भाजपा जी.अध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.तर आमदार कथोरे यांचाही पाचव्यांदा आमदार झाल्या बद्दल मुरबाड भाजपाच्या वतीने जाहिर सत्कार करण्यात आला.

यावेळी केलेल्या मार्गदर्शनात आमदार कथोरे यांनी पक्षातील दुसर्या गोटातील कार्यकर्त्या चा खरपुस समाचार घेतला.पक्षातील भेसळ दुर करण्याचा सल्ला नविन जिल्हा अध्यक्षांना देत माझ्या कार्यकर्त्या ला कोणी दुखावला तर मी ते सहन करणार नाही.सत्तेचा उपयोग शेवटच्या घटकापर्यंत पोहचला पाहिजे. कधी नव्हे ती मुरबाड तालुक्यात 17500 घरकुले मंजुर झाली आहेत हा महाराष्ट्रात इतिहास झाला आहे. कार्यक्रमा प्रसंगी मागेल त्याला घर मिळत असून कोणीही घरा पासून वंचित राहिला नाही पाहिजे,निवडणुका जवळ आल्या आहेत आपल्या गावचा सरपंच कोण पाहिजे त्याची निवड आत्ताच करा. सर्व निवडणुका आपल्याला ताकदीने लढायच्या आहेत आणि आपण जिंकणार आहोत असा विश्वास दर्शवला.

पुन्हा विकास आराखडा तयार करत आहोत त्या करिता आपल्या गावची विकास कामे कळवा, लवकरच जिल्हा परिषद गटांच्या बैठका सुरु करत आहोत, पावसाळा सुरु होत आहे जिथे जिथे काही अडचणी असतील त्या सोडवल्या जातील कार्यकर्ता मेळाव्यात मार्गदर्शन करताना म्हणाले.तर यावेळी दोन्ही नुतन मंडळ अध्यक्षांना पक्षाच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या. या मेळाव्याला आमदार किसनजी कथोरे,जितेंद्रजी डाकी ठाणे जिल्हा ग्रा.भाजपा जी.अध्यक्ष,भरत पाटील भाजपा महाराष्ट्र प्रदेश सदस्य,टी.डी.सी. बँक संचालक राजेश पाटील,टी.डी.सी. बँक व्हाईस चेअरमन अरुण पाटील,माजी ठाणे जि.प.सदस्य उल्हास बांगर, जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, नितीन मोहपे , सुधिर तेलवणे , सुरेश बांगर, अनिल घरत, मोहन सासे, मुकेश विशे,किसन अ.कथोरे, सचिन चौधरी, मानसी देसले, स्वरा चौधरी,आर पी आयचे दिनेश उघडे,सुवर्णाताई ठाकरे, सीमा घरत, मधुरा सासे, नंदा उघडा,ज्योती गोडांबे, रेश्मा घरत, पुनम पवार यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा पार पडला.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हभप रमेश शिंदे यांनी केले.



## उल्हासनगर : तीन पोलीस अधिकाऱ्यांचा भिमरत्न पुरस्काराने सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** 17-डिसेंबर 2024 मध्ये सुप्रसिद्ध खंजेरी वादक सत्यपाल महाराज यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यापासून उल्हासनगरातील ॲड. जय गायकवाड संस्थापीक स्वराज्य संघटना ही विविध सामाजिक उपक्रमांनी अल्पावधीतच कमालीची प्रकाशझोतात आली आहे. या संस्थेने आयोजित केलेल्या एका भव्य कार्यक्रमात तीन पोलीस अधिकाऱ्यांना भिमरत्न पुरस्काराने सन्मानित करून त्यांच्या उत्कृष्ट सेवेची दखल घेतली आहे.

वैशाखी बुद्ध पौर्णिमे निमित्ताने स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अ ॲड. जय गायकवाड यांच्या पुढाकाराने सुभाष टेकडी मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळील सिद्धार्थ स्नेह मंडळाच्या मैदानात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अंबरनाथचे सहायक पोलीस आयुक्त शैलेश काळे, कल्याणचे सहायक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, विठ्ठलवाडी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुखदेव पाटील यांचा भिमरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे.

या अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या ट्रॉफीवर आपण महापुरुषांच्या जयंतीमध्ये उल्लेखनीय कर्तव्यनिष्ठा, शांतता राखण्यात आणि उत्कृष्ट सेवा बजावल्याबद्दल आपल्या कार्याची मनःपूर्वक दखल घेऊन हा भीमरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याची पोचपावती देण्यात आली आहे.

## बदलापूर नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांचा बाजारपेठेत मान्सून पूर्व पाहणी दौरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. १८ :** पुराच्या समस्येने ग्रासलेल्या बदलापूर शहरात अवकाळी पावसामुळे मुख्य बाजारपेठेत पाण्याचे तळे निर्माण होत आहे. या पाण्याचा निचरा होण्यासाठी आणि बाजारपेठेतील स्वच्छतेसंदर्भात पावसाळापूर्वी त्या संबंधी उपाययोजना करण्यासाठी माजी नगरसेवक किरण भोईर यांनी पुढाकार घेतला. या संदर्भात पालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्यासह बाजारपेठेत पाहणी दौरा करण्यात आला. बदलापूर पश्चिमेकडील सखल भाग असणाऱ्या मुख्य बाजारपेठेत दरवर्षी पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यावर जवळपास गुडघाभर पाणी साचते. याच पाण्यातून नागरिकांना ये-जा करावी लागते. वाहनचालकांनाही वाहने चालवताना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यात मुख्य म्हणजे या ठिकाणी साचलेले पाणी वाहून जाण्यासाठी असलेले नाले येथील बांधकामामुळे अरुंद झाले आहेत. बाजारपेठेतील अडगळ जागा, त्यात विक्रेत्यांकडील शिल्लक भाजी, फळांचा ओला कचरा याच ठिकाणी साठवून ठेवला जात असतो. पावसात या ठिकाणी मोठी रोगराई पसरण्याची भीती असते. त्यामुळे बाजारपेठेतील स्वच्छता आणि पावसाळ्यात साचणारे पाणी याचा योग्य निचरा होण्यासाठी पालिकेने लक्ष देऊन काम करण्याची मागणी किरण भोईर यांनी पालिका प्रशासनाला केली आहे. या वेळी पालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी परिसरात पाहणी केली. या ठिकाणी स्वच्छता आणि पाणी निचरा होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येतील याचा आढावा घेतला असून, लवकरच हे काम पूर्ण होईल, असेही सांगितले आहे.

## कल्याण बस स्थानकात चोऱ्यांचे सत्र सुरूच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १८ (बातमीदार) :** कल्याण एसटी आगारात चोरीचे सत्र गेले काही दिवस सुरूच असून शनिवारी (ता. १७) सकाळी धाराशिव इथे राहणाऱ्या एका तरुणाची ७० हजार रुपये किमतीची सोनसाखळी चोराने लांबवली. याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन ते तीन आठवड्यांपासून कल्याण रेल्वेस्थानकाजवळच्या एसटी आगारातून सोनसाखळी आणि सोन्याचे मंगळसूत्र चोरीचे प्रमाण वाढले आहे. स्थानिक पोलिसांकडे याप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. पोलिसांना हे प्रकार माहिती असले तरी या चोरट्याच्या कृत्यांवर लगाम लागत नसून एसटी आगारात चोरीचे सत्र सुरूच आहे. पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, धाराशिव इथे राहणारे ३० वर्षीय राहुल गायकवाड हे कामानिमित्त कल्याणमध्ये आले होते. कल्याण आगारातून ते धाराशिव येथे जाणाऱ्या बसमध्ये सकाळी साडेसातच्या सुमारास चढत होते. यावेळी गर्दी असल्याने त्याचाच फायदा घेत त्यांच्या गळ्यातली २०.५ ग्रॅम वजनाची आणि ७० हजार रुपये किमतीची सोनसाखळी चोरट्याने खेचली. सोनसाखळी गेल्याचे लक्षात येताच गायकवाड बसमधून उतरले आणि पोलिस ठाणे गाठले. पोलिस चोरट्यांचा शोध घेत आहेत. काही दिवसांत या आगारातून १० लाखांच्या आसपास सोनसाखळया चोरीला गेल्या आहेत. त्यामुळे या चोराला लवकर पकडावे, अशी मागणी एसटी बस प्रवासी करत आहेत.

## जीवन पाटील यांच्या पाठपुराव्याने पेणच्या महावितरणला जाग
## झाडांच्या फांद्या व पालोपाचला उचलून परिसरची स्वच्छता



**पेण (प्रतिनिधी)** दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध होताच विज मंडळ खडबडून जागे झाले आणि जीवन पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे पेणच्या वीज मंडळाला जाग आली आणि पडलेल्या झाडांच्या फांद्या व पालोपाचला तात्काळ उचलण्यास सुरुवात केली आहे.

पेण शहरातील उपजिल्हा रुग्णालय , राजू पोटे मार्ग व इतर ठिकाणी विद्युत मंडळाने झाडांच्या फांद्या तोडून रस्त्याच्या फुटपाथवर तसेच पेणच्या रुग्णालयाच्या गेटवर ठेवल्या होत्या. त्यामुळे रुग्णालयाचा गेट पूर्णता बंद झाला होता. मुंबईच्या पाणीपुरवठ्यात ज्यांचे मोलाचे योगदान आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेत पाणीपुरवठा विभागात निवृत्त सहाय्यक अभियंता म्हणून उत्कृष्ट काम केलेले पेणचे सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ शिवसैनिक जीवन शंकर पाटील यांनी याबाबत आवाज उठवला व या तोडलेल्या फांद्या त्वरित उचलाव्यात अशी मागणी केली होती आणि त्यांच्या या मागणीला यश येऊन विद्युत मंडळ व पेण नगर परिषद प्रशासनाने तातडीने ट्रॅक्टर लावून आज 19 /05/2025 रोजी जागोजागी पडलेल्या फांद्या उचलण्यास सुरुवात केली आहे.त्यामुळे उपजिल्हा रुग्णालय पेण येथील रुग्ण , नागरिक व रुग्णालय कर्मचारी यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.जीवन पाटील यांनी पेण शहराचे मुख्य प्रवेशद्वार रायगड बाजार व चिंचपाडा या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्यांवर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांच्या बाबत देखील तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी केली आहे.

काही ठिकाणी एम एस कव्हर्स निघाले असल्यामुळे तेथे अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता असल्यामुळे त्याबाबत देखील उपाययोजना त्वरित व्हावी असे देखील त्यांनी सांगितले आहे. तोंडाशी आलेल्या पावसाळ्यामुळे जागोजागी फांद्या छाटणी करत असाल तर त्या त्वरित उचलण्याची कारवाई विद्युत मंडळाने यापुढे करावी असे नमूद करून त्यांनी विद्युत मंडळाचे आभार मानले.त्याच्या या कार्यामुळे पेण शहरातील नागरिकांनी जीवन पाटील यांचे कौतुक करून आभार मानले आहेत.



दैनिक जीवनदीप वार्ता

महावितरणने छाटलेल्या झाडांच्या फांद्या त्वरित उचलाव्यात -जीवन पाटील यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण शहरात ठीक ठिकाणी विज मंडळाने मंगळवारी झाडे तोडली असून फांद्या व पालापाचोळा तसाच ठेवला असल्यामुळे लोकांचा येण्या जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. पेण उपजिल्हा रुग्णालय येथील अवस्था अतिशय बिकट असून रुग्णांना जाण्या येण्याचा गेट पूर्णपणे बंद झाला आहे.रायगड बाजार समोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्याचप्रमाणे पावसाळा तोंडाशी असल्यामुळे दुर्गंधी पसरण्याच्या अगोदरच विज मंडळ व नगरपरिषद प्रशासनाने योग्य ती कारवाई करून सदर रस्त्यावर पडलेली झाडे त्वरित उचलून लोकांचा मार्ग मोकळा करणे गरजेचे आहेत अशी मागणी पेण करांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते जीवन पाटील यांनी केली आहे. काही ठिकाणी एम एस कव्हर्स निघालेले आहेत, पावसाळा तोंडाशी असल्यामुळे लहान मुलं, वयस्कर नागरिक यांचे अपघात होणार नाहीत याची दक्षता घ्यावी असेही सांगितले.

## कवितेतून प्रज्वलित झाली भीमविचारांची मशाल
## ‘कवितेतला भीमराव’ या काव्य मैफिलीतुन समाज जागर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त, स्मार्ट फाउंडेशन आणि एस.एस.टी. महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ‘कवितेतला भीमराव’ या आगळ्यावेगळ्या गीतकविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक जाणिवा जागवणारा हा कार्यक्रम एस.एस.टी.महाविद्यालयाच्या सभागृहात रसिकांच्या उस्फूर्त उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे आणि महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी यांच्या हस्ते झाले. तर, कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्या व स्मार्ट फाउंडेशनच्या अध्यक्षा वसुंधरा मोरे-केदारे होत्या. सुप्रसिद्ध गीतकार डॉ.विनायक पवार आणि कायद्याने वागा लोकचळवळीचे प्रणेते राज असरोंडकर यांचे कार्यक्रमाला विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमात अंबरनाथ नगर परिषदेच्या माजी नगरअध्यक्षा मनीषा वाळेकर, जिजाऊ सावित्री रमाई प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मनोज शेलार, नाना पवार (म.प्र. प्रदेश सचिव, रिपाई आठवले गट), साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे आधार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश जाधव, कार्यकारी अभियंता दिलीप बागुल आणि उपप्राचार्य प्रा.डॉ.दिपक गवादे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ विधीतज्ञ दिलीप वाळंज यांना ‘ब्लू सन्स’ पुरस्काराने गौरविण्यात आले.

गायक आय. एम.मोरे, भारत अंबवणे, शाहीरा ऐश्वर्या पवार यांची साऊ, वैशाली पगारे याची भिमराज की बेटी,आणि सचिन सरदार यांनी सामाजिक चळवळीवर आधारित भावस्पर्शी गीतगायन केली. तर राज असरोंडकर यांच्या अनोखी भीमवंदनेने रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुवर्णा अहिरे, प्रा. प्रफुल केदारे आणि प्रा.वृषाली विनायक यांनी उत्तमरित्या पार पाडले. भारावून टाकणाऱ्या निवेदन शैलींमुळे संपूर्ण कार्यक्रम प्रवाही झाला.

काव्यवाचन सत्रात कवी जितेंद्र लाड, मंगेश सरदार, डॉ. नरसिंग इंगळे, श्रीकांत बागुल, किरण भिलारे, सोनाली जाधव आणि प्रा. डॉ. दीपक गवादे यांनी सामाजिक विषयांवर प्रभावी कविता सादर केल्या. या कवितांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, समतेचा मूलमंत्र आणि नवभारताची दिशा ठळकपणे समोर आली.







‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com